## ❊ थकबाकी व त्यावरील कार्यवाही -

वर्षाचे सुरूवातीला एकूण थकबाकी रूपये १९०६.२० लाख होती. अहवालाच्या वर्षात रूपये ९९२.८३ लाखाची थकबाकी वसुल झाली. तसेच रूपये २१७४.६९ लाखाची थकबाकी वाढ झाली. त्यामुळे वर्ष अखेर एकूण थकबाकी रूपये ३०८८.०६ लाख झाली आहे. या रकमेपैकी रूपये ३६४.८५ लाखाचे हुकुमनामे सहकारी न्यायालयाकडुन मिळाले असून त्यांची अंमलबजावणी विशेष वसुली अधिकारी यांचेमार्फत सुरू आहे.

रूपये १८.६४ लाखाच्या वसुलीसाठी सहकारी न्यायालयात लवाद दावे दाखल करण्यात आले आहेत. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम १०१ अन्वये मा. सहायक निबंधक सहकारी संस्था यांचे कोर्टात वसुली प्रमाणपत्र मिळविण्यासाठी रूपये ३७.३६ लाखाचे दावे दाखल केले आहेत. उर्वरित रकमेसाठी लवाद दावे दाखल करण्याचे काम सुरू आहे. ज्या सभासदांकडे बँकेची थकबाकी आहे त्यांनी त्यांचेकडे असलेली कर्जाची रक्कम बँकेत त्वरीत जमा केल्यास दावे दाखल करण्याचे काम कमी होईल व बँकेची कार्यक्षमता अधिक वाढण्यास मदत होईल. तरी विनंती की, थकबाकीदारांनी योग्य तो प्रतिसाद देऊन बँकेच्या विकासाला हातभार लावावा.

## ❊ अग्रक्रमासाठी दिलेली कर्जे -

आपले बँकेने रिझर्व्ह बँकेच्या परिमाणानूसार अग्रक्रम क्षेत्रास दिलेल्या घटकांना (प्रायोरीटी सेक्टर ॲडव्हानसेस) दिलेली कर्जे पुढीलप्रमाणे आहेत. एकूण कर्जाशी प्रमाण ६६ टक्के आहे.

(रूपये लाखात)

| अ.नं. | अग्रक्रम घटक | सभासद संख्या | येणे बाकी ३१.०३.२०१८ |
|---|---|---|---|
| १. | शेतीला पुरक असणारे उद्योग | ४०६८ | ५४९९.३६ |
| २. | कुटीर व लघुउद्योग | १९२६ | ४२३२.९५ |
| ३. | वाहन कर्ज (परिवहनासाठी) | ९४५ | १२९२.६५ |
| ४. | अ) स्वस्त धान्य दुकान | १७०३ | ४३७३.९३ |
| | ब) चिल्लर व्यापारासाठी रू.२ लाख पावेतो | ३५०७ | ३७४९.७० |
| ५. | छोटे व्यवसाय उद्योग | २१०२ | ६४५०.९० |
| ६. | स्वयंरोजगार व स्वनियोजित व्यावसायिक | ३८७७ | ११५१६.१२ |
| ७. | शैक्षणिक | १७८ | ११९९.९६ |
| ८. | घरबांधणी - घरदुरूस्ती | २१९६ | ५६१५.१२ |
| ९. | गृहपयोगी वस्तुसाठी कर्ज | २३९४ | ६१८.२८ |
| | **एकूण** | **२२८९६** | **४४५४८.९७** |